महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणेशहर (२), पुणे यांचे समोर,**

**टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय दुसरा मजला, शुक्रवार पेठ, पुणे २**

**दुरध्वनी : ०२०-२४४३३३१३** ई-मेल आयडी-drcspunecity२@gmail.com

जा.क्र.उनि(२)/गृह/ प्रेमानंद हौ.विभाजन/कलम १७/२०२३/ 9305 दिनांक : २७/०९/२०२३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व नियम १९६१ चे नियम १६(७) अन्वये सुधारीत आदेश**

**वाचले :-**

१. या कार्यालयाकडील कलम १७ व नियम १६(७) अन्वये दिनांक ३१/०७/२०२३ रोजीचा आदेश.
२. अध्यक्ष, प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या; यांचे दिनांक २१/०९/२०२३ रोजीचा सुधारीत आदेश मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, प्रेमानंद सहकारी गृहरचना संस्था मर्या., ९९२,९९३, ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० ही संस्था (यापुढे मुळ संस्था असे संबोधले जाईल) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदविण्यात आली असून तिचा नोंदणी क्र.पीएनए/एचएसजी/११३६/१९७५, दिनांक ३०/०७/१९७५ असा आहे. आणि ...

ज्या अर्थी, वाचले क्र.४ नुसार मुळ संस्थेच्या दिनांक २२/०१/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार मुळ संस्थेचे २ संस्थांमध्ये विभागणी करण्यासाठी योजना संमत करण्यात आली असून मुळ संस्थेने संस्थेच्या विभाजनास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे, आणि...

ज्या अर्थी, वाचले क्र.२ नुसार दिनांक २२/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजुर केलेल्या योजनेचा अभ्यास करुन संस्थेची विभागणी २ संस्थांमध्ये करण्याच्या प्रस्तावावर या कार्यालयात दिनांक २९/०३/२०२३ व दि. १९/०४/२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. आणि...

ज्या अर्थी, दिनांक २२/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेतील संस्था विभाजनाची योजना पाहता असे दिसून येते की, संस्थेच्या ज्या मत्ता व दायीत्वे आहेत, त्याबाबत सभासदामध्ये कोणत्याही प्रकारचे वाद नाहीत. प्रस्तावासोबत मुळ संस्थेच्या मत्ता व दायित्वे बाबत केलेली विभागणी ही दिनांक ३१.०३.२०२२ अखेरच्या ताळेबंदावरुन केलेली आहे, तसेच त्यानुसार दिनांक ३१.०३.२०२२ अखेरचे वैधानिक लेखापरिक्षणही केलेले आहे. मुळ संस्थेने दाखल केलेल्या प्रस्तावानुसार मुळ संस्थेचे मान्यताप्राप्त ले-आऊट नुसार संस्थेने एकुण क्षेत्र दोन संस्थांमध्ये अनुक्रमे प्रेमानंद अे व प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या. ९९२,९९३, ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० मध्ये विभाजित केलेले असून नियोजित प्रेमानंद अे संस्थेस १८००.७२ चौ.मी. व नियोजित प्रेमानंद बी संस्थेस १७१०.८० चौ.मी. इतके क्षेत्र वाटप केलेले आहे, सदर केलेले क्षेत्राचे वाटप हे मान्यताप्राप्त आर्किटेक यांचेकडून करुन घेतलेले आहे. असे नमूद केलेले असून

याऐवजी

नियोजित प्रेमानंद अे संस्थेस १८०० चौ.मी. व नियोजित प्रेमानंद बी संस्थेस १६९५.५० चौ.मी. इतके क्षेत्र वाटप केलेले आहे, सदर केलेले क्षेत्राचे वाटप हे मान्यताप्राप्त आर्किटेक यांचेकडून करुन घेतलेले आहे. असे वाचण्यात यावे. (संदर्भ क्रमांक ५ सोबत सादर केलेल्या दस्तएवजानुसार व नगर भूमापन क्रमांक ९६/५० या मिळकत पत्रिकेत नमूद क्षेत्रफ़ळानुसार )

ज्या अर्थी, मुळ संस्थेची विभागणी करण्यासाठी सदर संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७(१)(एफ) व त्याखालील नियम १९६१ चे नियम १६ (३) व (४) मध्ये निर्धारित केलेल्या कार्यप्रणालीनुसार निबंधकाचे पुर्वपरवानगीने संस्था विभाजन योजनेस आणि मत्ता व विभागणी संदर्भात सभासद धनको यांना नमुना 'ग' मधील नोटीस संस्थेच्या नोटीस बोर्डावर दिनांक २३/०१/२०२३ रोजी व वर्तमान पत्रात दिनांक ०८ जुन २०२३ रोजी प्रसिध्द करुन संबंधीतांना वरणाधिकार (option) चालविण्याची संधी दिलेली आहे. वास्तविक मुळ संस्थेस कोणीही धनको नसल्याचे दिनांक ३१.०३.२०२२ च्या ताळेबंदावरुन दिसून येते. संस्थेच्या दिनांक २२/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत संस्था विभाजनाची योजना तपशिलवार मांडण्यात आली असून त्याबाबत कोणाही सभासदाने लेखी हरकत नोंदविली नसल्याचे सभावृत्तांतावरुन दिसून येते. सदर ठराव कायदयातील तरतुदीनुसार २/३ बहुमताने मंजुर

होणे आवश्यक आहे. तथापी सदर ठराव सर्वानुमताने मंजुर झालेला आहे.तसेच संस्थेच्या सभासदांनी विभाजन योजनेस अनुकुल असलेबाबत लेखी संमती दिलेली असून ती प्रस्तावासोबत दाखल केलेली आहेत. या सर्व बाबी विचारात घेता मुळ संस्थेने संस्था विभाजनासाठी घालून दिलेल्या कलम १७ व नियम १६ मधील कार्यप्रणालीचा अवलंब केलेला आहे. आणि...

ज्या अर्थी, मुळ संस्थेच्या अे, व बी अशा दोन इमारती असून सभासदांच्या हितासाठी व सोयीस्कर व्यवस्थापन व पुर्नविकसनाकरिता मुळ संस्थेची विभागणी २ संस्थांमध्ये करणे जरुरीचे आहे. सादर केलेल्या विभाजनाच्या प्रस्तावास अनुसरुन संस्थेची योग्य पध्दतीने व परिणामकारक देखरेख व व्यवस्था पाहण्यासाठी मुळ संस्थेची विभागणी करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झालेली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## सुधारीत आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व नियम १९६१ चे नियम १६ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी निलम पिंगळे, उपनिबंधक सहकारी संस्था, पुणेशहर (२), पुणे असा आदेश देत की प्रेमानंद सहकारी गृहरचना संस्था मर्या., ९९२,९९३, ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० जिचा नोंदणी क्र. पीएनए/एचएसजी/११३६/१९७५, दिनांक ३०/०७/१९७५ असा असून या संस्थेच्या दिनांक २२/०१/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठरावास अनुसरून सदर संस्थेची खालील दोन संस्थांमध्ये विभाजन करण्यास खालील अटींवर मंजुरी देत आहे. मुळ संस्थेच्या विभाजनाच्या अटी व शर्ती सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ-१, अ-२, ब, क-१, क-२ मध्ये नमूद केलेप्रमाणे राहतील. या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ-१ अ-२ प्रमाणे विभाजित संस्थांचे सभासद असतील. परिशिष्ठ ब प्रमाणे विभाजित संस्थांची मत्ता व दायीत्वे आणि परिशिष्ठ क प्रमाणे विभाजित संस्थांनी धारण करावयाच्या जमिनीचे क्षेत्र असेल.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (२)

मुळ संस्थेची नोंदणी या कार्यालयाकडील आदेश नुसार रद्द करण्यात येत आहे.

**अ) संस्था क्र. १ ते २ यांची नोंदणी खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.**

१) प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॉट ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० - (संस्था क्र.१)
(पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/ २५९४० /२०२३, दिनांक ३१/०७/२०२३)

२) प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९२ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० - (संस्था क्र.२)
(पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/ २५९४१ /२०२३, दिनांक ३१/०७/२०२३)

मुळ संस्थेच्या मत्ता व दायीत्वांचे वर्गीकरण करुन त्यांची विभागणी करण्यात आली आहे.

संस्था क्र.१ व २ या संस्थांची मत्ता व दायित्वे सोबत जोडलेल्या परिशिष्ठ ब प्रमाणे राहतील. संस्थेने तिच्या दिनांक २३/०१/२०२३ रोजी तीच्या सभासदांना विहीत नमुना ग मधील नोटीशीत नमुद केलेनुसार तसेच दिनांक २२/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव संमत केलेनुसार संस्थेतीलदिनांक ३१/०३/२०२२ नंतर काही मत्ता व दायीत्वे धारण केली असतील तर त्यांची विभागणी संस्था १ व २ यांनी एकत्रीत येऊन करावी. यात मतभेद झाल्यास सदरची बाब उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर(२), पुणे यांचा या बाबतचा निर्णय अंतिम असेल व तो संस्था १ व २ यांचेवर बंधनकारक राहील.

मुळ संस्थेच्या विभाजनानंतर संस्था क्र. १ व २ यांची नोंदणी करण्यात येईल. अशा संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५९ प्रमाणे संस्थेच्या नोंदणीनंतर प्रथम सर्वसाधारण सभा नोंदणीच्या दिनांकापासून ३ महिन्यात घेणे संबंधीतांवर बंधनकारक राहील. स्वतंत्र्य संस्थेची हंगामी समितीची नियुक्ती झालेली असून (Provisional Committee) सदरची हंगामी समिती प्रथम सभेपासुन १ वर्षापर्यंत राहील. संस्था क्र.१ व २ यांच्या हंगामी समितीचे सदस्य खालीलप्रमाणे राहतील.

**१) प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॅाट ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० संस्था क्र.१ ची हंगामी समिती :-**

१) श्री. अशोक कृष्णाजी साळुंके, २) श्री. चेतन ज्ञानेश्वर खेडकर, ३) श्री. तुषार सत्यनारायण ब्रह्मे ४) श्री. केदारनाथ भास्कर निकम, ५) श्रीमती. वासवी राजेन बक्षी, ६) श्री. श्रीकांत बुध्दीकोट, ७) सो. प्रतिभा साळुंके

**२) प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॅाट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३० संस्था क्र.२ ची हंगामी समिती :-**

१) श्री. अजय विजय गायकवाड, २) श्री. प्रसाद वाळुंजकर, ३) श्री. कार्तीक अनिल वकील, ४) श्री. मिलिंद सुमंतरांव कुलकर्णी, ५)श्री. संदिप प्रभाकर इनामदार, ६) श्री. प्रविण वसंतरांव फ़डणीस, ७) श्रीमती. लता दत्तात्रय पाटणकर, ८) श्री. चंद्रशेखर नारायण केंदळे, ९) श्री. दिपक भेय्यालाल ढेलवान.

संस्था क्र. १ चे वतीने श्री. अशोक कृष्णाजी साळुंके व संस्था क्र. २ चे वतीने श्री. दिपक ढेलवान यांना पहिली सर्वसाधारण सभा बोलविणे व त्या सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रतिसह अहवाल सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. अशी सभा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ५९ अन्वये आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत बोलविली पाहीजे.

मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ किंवा भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विभागणीमुळे मूळ संस्थेची नोंदणी रद्द करण्यात आली असल्यामुळे सदर संस्थेची मत्ता व दायीत्वे नवीन संस्थांच्या नांवे हस्तांतर होण्यासाठी सदर आदेश हे पुरेसे अभिहस्तांतरण पत्र असेल. त्यासाठी मुळ संस्थेने नवीन संस्थांच्या नांवे पुन्हा वेगळे हस्तांतरणपत्र करण्याची आवश्यकता नाही.

संस्थेच्या विभाजनामुळे मुळ संस्थेने सुरु केलेली अथवा संस्थेविरुध्द चालु असलेल्या न्यायीक कार्यवाहीस बाधा येणार नाही. मुळ संस्थेने सुरु केलेल्या अथवा तिच्या विरुध्द चालु असलेला न्यायिक कारवाईची जाबावदारी विभाजनामुळे नवीन नोंदणी झालेल्या दोनही संस्थांवर राहील.

सदर सुधारीत आदेश आज दिनांक २७/०९/२०२३ रोजी मी माझ्या सहीने व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

(निलम पिंगळे)
उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणेशहर (२) ,पुणे

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे

प्रति,

१) प्राधिकृत अधिकारी, प्रेमानंद ए सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॉट ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३०

२) प्राधिकृत अधिकारी, प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या. अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ३०

३) शाखा व्यस्थापक, पुणे म्युनिसिपल कार्पोरेशन सर्व्हन्ट्स को-आप अर्बन बँक लि. पुणे सदाशिव पेठ, पुणे ३०

४) शाखा व्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा टिळक रोड,पुणे

५) मा.नगर भूमापन अधिकारी (क्र.२), पुणे

४) अभिलेख कक्ष प्रमुख,
त्यांना कळविण्यात येते की, मुळ संस्थेचे अ धारिका व संस्था क्र.१ व २ यांच्या अ धारिका सोबत जोडल्या आहेत. मुळ संस्थेची अ धारिका विभाजनाबाबत वाद निर्माण झाल्यास हा वाद पुर्णपणे निकाली निघत नाही, तोपर्यंत सदर धारिका जतन करावी. अन्यथा आदेशाचे दिनांकापासुन ५ वर्षे जतन करावी. उर्वरित अ धारिका नियमाप्रमाणे जतन करावी. त्याप्रमाणे आपल्या ॲपेंडीक्स ए मध्ये नोंद घ्यावी.

५) व्यवस्थापक, येरवडा कारागृह, मुद्रणालय, पुणे ६
आपणांस कळविण्यात येते की, सदर आदेश नजीकच्या काळात प्रसिध्द होणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग-२ मध्ये छापून प्रसिध्द करावा व प्रकाशनाच्या १० सुटया प्रती या कार्यालयास पाठवाव्यात.

उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणेशहर (२) ,पुणे